


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख ८ जून, १९४९ | अंक २३


## धी कोपरगांव पीपल्स को. ऑ. बँक लि.

**कोपरगांव, जि. अहमदनगर.**

( उद्घाटन समारंभ : ता. १७-१-१९४९ )

कोपरगांव येथील अत्यंत प्रतिष्ठित नागरिक यांचे देखरेखीखालीं स्थापित झालेली आणि आधुनिक पद्धतीवर बँकिंगचे सर्व व्यवहार करणारी.

**स्थानिक सहकारी बँक**

**सुरुवातीचें शेअर भांडवल : ६८,७५० रु.**

बिलें वसुली, हुंड्या, मुंबईवरील चेक्स, ड्राफ्टस, वगैरे व्यवहार केले जातात.

आकर्षक व्याजावर मुदतीच्या ठेवी ३ महिनेपासून ५ वर्षें-पर्यंत स्वीकारल्या जातील.

सेव्हिंग्ज बँकेंत रु. १०,००० पर्यंत व्याज देणेंत येतें.

**विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.**

जी. पी. ठाणेकर बी. ए. मॅनेजर | मोहनलाल कालिदास व्यास चेअरमन

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

*पॅलेस स्ट्रीट, सातारा*

शाखाः—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. २१-१२-४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठेवी | रु. | ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

**मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :**

| १ वर्ष | दोन वर्ष | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | २-०-० |
| चालू डिपॉझिट | „ | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. | वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

**( शिड्यूल्ड बँक )**

**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग**

**पुणें २.**

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,०० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१५,१६५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७१,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर | श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

# सर्व प्रसिद्ध माल

**सुंदर घडीच्या व इतर लाकडी फर्निचर व इमारतींना लागणारे खिडक्या, दारे वगैरे.**

**केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें २** | **केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक.**

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


## विविध माहिती

**बंगालमध्यें पेट्रोल बनवण्याचा कारखाना**—पश्चिम बंगालमधील दुर्गापूर ह्या ठिकाणीं रासायनिक पद्धतीनें पेट्रोल बनविण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्याला ७० कोटी रुपये खर्च येईल. कारखाना उभारण्यास दोन वर्षांचा अवधी लागेल. तो चालू झाल्यावर दर वर्षी विमानांना लागणारें ६७,००० टन पेट्रोल तयार होईल. त्याशिवाय मोटारींना लागणारें वंगणाचें तेलही तयार होईल. कारखाना उभारण्याचें काम एका अमेरिकन कंपनीला देण्यांत येणार असून त्यावर एक जर्मन कंपनी देखरेख ठेवणार आहे.

**हिंदमधील बंधरांची सुधारणा**—हिंद सरकारनें कोट्यावधी रुपये खर्चून देशांतील बंदरांची सुधारणा करण्याचें आणि नियात व्यापार वाढविण्याचें ठरविलें आहे. गेल्या वर्षी हिंदुस्थाननें निर्यातीपेक्षा ९०,००,००,००० रुपये किंमतीचा अधिक माल आयात केला. गेल्या फडणिशी वर्षांत समुद्रमार्गें आणि खुष्कीनें आयात–निर्यात झालेल्या मालावर १,६८,५३,००,००० रुपये जकातीचें उत्पन्न झालें. त्यापैकीं २४,४४,००,००० रुपये निर्यातीवरील कराच्या रूपानें वसूल झाले. आयात करांचें उत्पन्न ९७,७६,००,००० रु. झालें. हिंदनें आपली सामुद्रिक वहातूक आणि निर्यात व्यापार वाढविल्याशिवाय देशाची अर्थव्यवस्था सुरळीत चालणार नाहीं अशी परिस्थिति आहे.

**हिंदुस्थानांतील शेतीची पद्धत**— संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या अन्न आणि शेती संघटनेचे अध्यक्ष मि. डॉड ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं पाश्चिमात्य राष्ट्रांतील यांत्रिक शेतीचा अवलंब करणें हिंदुस्थानच्या दृष्टीनें फायद्याचें ठरणार नाहीं. त्यांनीं हिंदुस्थानसाठीं एका चतुर्विध योजनेची शिफारस केली आहे. (१) पडीक जमीन लागवडीखालीं आणण्यासाठींच फक्त यंत्रांचा उपयोग करावा (२) कृत्रिम खतें वापरण्याऐवजीं जमिनींतील कस कायम रहावा अशीं पिकें काढावीं (३) जमीन धुपून जाऊं नये म्हणून जंगलें बेतानें तोडावीं आणि (४) 'ट्यूब वेल्स' (विहिरी) खणून शेती करावी. ह्या विहिरींमुळें भूमिगत पाण्याचा सांठा कमी होण्याची भीति नाहीं.

**मुंबई प्रांताचे अधिक अन्नधान्यासाठी प्रयत्न**—हिंद सरकारचे अन्नमंत्री श्री. जयरामदास दौलतराम ह्यांनीं आनंद येथें जिल्हा अन्नधान्य परिषदेचें उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले कीं, मुंबई प्रांत राष्ट्रीय चळवळींत पुढें असतो. सध्या देशांत अन्नधान्याचा तुटवडा पडला असल्यामुळें अधिक धान्य पिकविण्याची जी मोहीम सरकारनें हातीं घेतली आहे, तींतही तो पुढेंच आहे.

**जातीय सहकारी संस्था आणि सरकारी नौकर**—कांहीं दिवसांपूर्वी मुंबई सरकारनें एक पत्रक काढून जातीय स्वरूपाच्या संस्थांपासून गॅझेटेड ऑफिसर्सनीं अलिप्त रहावें असें फर्माविलें होतें. एखाद्या सहकारी संस्थेंत विशिष्ट धर्माचेच अगर जातीचेच लोक घेण्यांत येत असतील तर अशा संस्थांतून वरील सरकारी नौकरांनीं भाग घ्यावा किंवा नाहीं ह्याबद्दल संदेह उत्पन्न झालेला होता. आतां सरकारनें असा स्पष्ट खुलासा केला आहे कीं, जातीय स्वरूपाच्या सहकारी संस्था सुद्धा वरील निर्बंधाच्या कक्षेंत येतात.

**मद्रासमध्यें मोटारींचा कारखाना**— मद्रासमध्यें आणखी एक मोटारी जुळविण्याचा कारखाना काढण्याची परवानगी हिंद सरकारनें एका ब्रिटिश कंपनीला दिली आहे. हा कारखाना मद्रास शहराच्या पश्चिमेला २० मैलांवर असलेल्या वडालर येथें पुढील जानेवारी महिन्यांत काढण्यांत येणार आहे. प्रांतिक सरकारनें कारखान्यासाठीं ६० एकर जागा देऊं केली आहे. कारखान्यांत दर वर्षी ६,००० मोटारी तयार होतील अशी अपेक्षा आहे.

**हिंदची नवीन पोस्टाचीं तिकिटें**—हिंदुस्थानच्या गतेतिहासांतील स्मृति करून देणारीं नवीं पोस्टाचीं तिकिटें ता. १५ ऑगस्ट १९४९ पासून वापरण्यांत यावयाचीं आहेत असें समजतें. हा दिवस हिंदी स्वातंत्र्याचा दुसरा वाढदिवस आहे. किंग जॉर्ज बादशहाच्या मुखवट्याचीं पोस्टाचीं जुनीं तिकिटें संपेपर्यंत तींही वापरांत राहणार आहेत.

**मातीच्या तपासणीची प्रयोगशाळा**—नाशिकपासून ४ मैलांवर गंगापूर धरण–योजनेच्या नियोजित जागेनजीक एक माती–विषयक प्रयोगशाळा स्थापन करण्यांत आली आहे. निरनिराळ्या प्रकारच्या मातींचा धरण बांधण्यासाठीं कितपत उपयोग होईल ह्यासंबंधीं प्रयोगशाळा संशोधन करणार आहे. गंगापूरचें धरण सर्वस्वीं मातीचें बांधण्यांत येणार असून त्यावर ह्या प्रयोगशाळेची देखरेख राहील. मुंबई प्रांतांत अशा प्रकारची ही संस्था पहिलीच आहे.

### गृहमंत्र्यांच्या हस्तें उद्घाटन

किर्लोस्कर बंधु लि. च्या कचेरीसाठीं मुद्दाम बांधण्यांत आलेल्या मोठ्या इमारतीचा उद्घाटन समारंभ १ जून, १९४९ रोजीं किर्लोस्करवाडी येथें मुंबई सरकारचे गृहमंत्री ना. मुरारजी देसाई ह्यांच्या हस्तें झाला.


# DECCAN INSTITUTE OF COMMERCE POONA

**( Recognised by Government )**

Classes for the 1949-50 Session will begin on Monday the 20th June 1949. Students coached up for G. C. D., L. C. C., D. Com. ( I. M. C. ), R. A. ( 1st ), G. D. C. & A., Shorthand and Typewriting. Courses suitable for Graduates, S. S. C. students, Matriculates and non-matriculates. Morning and Evening Classes. Prospectus free on application to:

Deccan Institute of Commerce
Building,
594 Budhwar Peth,
Jijamata Bag Corner,
Poona 2.

**Secretary.**

बेडेकर पापड वापरा

# अर्थ

बुधवार, ता. ८ जून १९४९



संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## परदेशी भांडवलाचें स्वागत करणें भाग आहे !

### परिस्थितीचें "टाटा क्वार्टर्ली" कृत पृथःकरण

हिंदुस्थानांत परकीयांच्या भांडवलास कितपत वाव असावा, ह्या संबंधीं आतां बरीच चर्चा चालू आहे. हिंदी भांडवल मोठाले कारखाने उभारण्यास पुढें येत नसल्याकारणानें, परंतु औद्योगिक वाढ तातडीनें होणें आवश्यक झालें असल्यामुळें, परदेशी भांडवलास मज्जाव करण्याची पूर्वीची भूमिका आतां नाहींशी झाली आहे. उलट, तें येथें आकर्षित करण्याचे प्रयत्न करण्याची पाळी आली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हिंदी लोकांच्या रहाणींत तात्काळ सुधारणा घडून येईल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती ती फलद्रूप होणें अर्थातच शक्य नव्हतें. तथापि, आर्थिक हलाखी पूर्वीप्रमाणेंच कायम राहिली, तर त्या परिस्थितीचे राजकीय परिणाम काय होतील ह्या गोष्टीनें आतां महत्त्व धारण केलें आहे आणि आर्थिक उन्नतीच्या प्रश्नास आतां राजकीय व आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालें आहे. आर्थिक परिस्थिति सुधारण्यास वाढत्या लोकसंख्येची आडकाठी येत असल्यानें हा प्रश्न फारच तातडीचा झाला असून त्यानें गंभीर स्वरूप धारण केलें आहे. हिंदुस्थानास आर्थिक प्रगतीचा फार मोठा पल्ला गांठावयाचा आहे आणि त्यासाठीं प्रचंड औद्योगिक भांडवलाची आवश्यकता आहे. ही गरज तुटपुंज्या स्वदेशी भांडवलानें भागण्याजोगी नसल्यानें परदेशी भांडवलास निमंत्रण देऊन तें इकडे आणणें भाग होत आहे. युद्धकाळांत कॅनडा व ऑस्ट्रेलिया ह्यांना औद्योगिक क्षेत्रांत फार मोठी प्रगति करता आली, ह्याचें कारण त्यांचे जवळ संचित भांडवल होतें तें त्यांस कामास लावतां आलें, हें होय. नुसती मोठी लोकसंख्या आवश्यक त्या यंत्रांच्या व कच्च्या मालाच्या अभावीं कोणतेंच महत्त्वाचें उत्पादन करूं शकत नाहीं. यंत्रें व कच्चा माल असला, तरी तज्ज्ञ यंत्रज्ञ हवेत आणि व्यापक संशोधनाचें फळ देतां येणारीं पेटंटसहि आपल्या पदरीं पाहिजेत. आजची हिंदी प्रजा ह्या साधनांचे अभावीं निष्क्रिय झालेली असून तिचा बोजा सहन करण्याइतकी देशाची परिस्थिति उरलेली नाहीं. अशा परिस्थितींत परकीयांचें सहकार्य घेणें क्रमप्राप्तच ठरतें. "टाटा क्वार्टर्ली"च्या ताज्या अंकांत ह्या महत्त्वाच्या प्रश्नाची चर्चा करण्यांत आली आहे.

हें सहकार्य परकीयांनीं कां द्यावें ? त्यांच्या देशापेक्षा हिंदुस्थानांत त्यांना कांहींतरी ज्यास्त आकर्षण वाटलें नाहीं, तर त्यांनीं हिंदुस्थानाकडे कां वळावें ? हिंदुस्थानांत राजकीय दृष्ट्या सुरक्षितता आहे, त्याच्या आर्थिक बळकटीबद्दल शाश्वती वाटते, वागणूक सर्वांस सारखी आहे, नफा आणि भांडवल हीं आणण्या-नेण्यावर बंधनें नाहींत आणि धंद्यांचें राष्ट्रीयीकरण केलें तर योग्य भरपाई मिळण्याची खात्री आहे, अशी परिस्थिति असेल तरच परदेशीय लोक आपलें भांडवल हिंदुस्थानांत गुंतविण्यास तयार होतील. ह्यासंबंधांत आपले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनीं हिंदी पार्लमेंटांत ६ एप्रिल रोजीं जाहीर आश्वासन दिलें त्याचें अमेरिकेंत व इंग्लंडमध्यें स्वागतहि चांगलें झालेलें आहे. केवळ परदेशी भांडवल हिंदुस्थानांत येणारच नाहीं; त्याबरोबरच ज्या व्यवसायांत तें गुंतविलें जाणार त्यांचेवर परदेशी भांडवलदारांचें नियंत्रण हें ओघानें येणारच. कांहीं विशिष्ट मुदतींत परदेशी भांडवलदारांनीं कारखान्यांतील क्लृप्त्या त्यांच्या हिंदी सहाय्यकांस समजावून सांगितल्या पाहिजेत आणि त्यांनीं हिंदी तंत्रज्ञ शिकवून तरबेज केले पाहिजेत अशा प्रकारच्या कांहीं अटी घातल्या तर त्या अमान्य होण्याचें कारण नाहीं. मूलग्राही महत्त्वाच्या कारखान्यांचे उभारणीस फार मोठ्या प्रमाणावर भांडवल लागतें, तें परदेशीयांनीं पुरविल्यावर, त्यांचें नियंत्रण मर्यादेंत ठेवण्याचा महत्त्वाचा व अवघड प्रश्न सोडवावा लागेल, कारण ह्या कारखान्यांचा लष्करी तयारीशीं निकटचा संबंध असतो. हिंदी व परदेशी भांडवलदारांच्या संयुक्त मालकीचे कारखाने कांहीं प्रमाणांत ही अडचण दूर करूं शकतील, परंतु त्यांचे एकमेकामधील करार व्यापक हिंदी हितसंबंधांस पोषक असतीलच कशावरून ? ह्यासाठीं, त्यांचे करारांस हिंदी सरकारची पूर्व मान्यता आवश्यक असावी असें "टाटा क्वार्टर्ली"नें सुचविलें आहे. मूलग्राही महत्त्वाचे धंदे सोडले तर बाकीच्या धंद्यांत कांहीं परदेशी भांडवलानें प्रवेश केला तर त्याचा परिणाम सर्वसाधारणपणें चांगलाच होईल असाहि अभिप्राय त्यानें व्यक्त केला आहे.

परदेशी भांडवलाचे विरुद्ध हिंदुस्थानांत जो ग्रह निर्माण झालेला आहे, त्याचें कारण ब्रिटिश भांडवलानें हिंदी राजकीय भवितव्यावर आजवर गाजविलेलें वर्चस्व, हें होय. ही भीति आतां बाळगण्याचें वास्तविक कारण नाहीं. इतर कित्येक देशांनीं परदेशी भांडवलाचें सहाय्य घेतलेलें आहे. त्याचे दर माणशीं आकडे पाहिले, तर हिंदुस्थानचा सर्वांचे शेवटीं अनुक्रम लागतो. त्यावरून परदेशी भांडवलास हिंदुस्थानांत केवढा वाव आहे, म्हणजेच हिंदी भांडवल संचय अजून अद्याप केवढा मोठा व्हावयास पाहिजे, ह्याची कल्पना येईल. अर्थात, एकंदर असमाधानकारक आर्थिक परिस्थितीचेंहि तें प्रतिबिंब आहे.

वेगवेगळ्या देशांत दर माणशीं परदेशीय भांडवल ( रुपये )

( युद्धापूर्वीचे आकडे )

| | | | |
|---|---|---|---|
| न्यूझीलंड | १,७०७ | डेन्मार्क | ३६० |
| कॅनडा | १६९३ | जर्मनी | २६७ |
| ऑस्ट्रेलिया | १,६२७ | झेकोस्लोव्हाकिया | ८० |
| आर्जेंटिना | ७३३ | जपान | ५३ |
| नॉर्वे | ६०० | हिंदुस्थान | २७ |

**ग्रामोद्योगासाठी जपानी यंत्रज्ञ**—हिंदमधील निर्वासितांना ग्रामोद्योगाचें शिक्षण देण्यासाठी सरकारनें जपानी यंत्रें आणि यंत्रज्ञ ह्यांची मागणी केली आहे. उशिरांत उशीर ता. ३१ ऑक्टोबर १९४९ नंतर निर्वासितांना फुकट पोसण्याचें सरकार बंद करणार आहे. त्या मुदतीच्या आंत वरील ग्रामोद्योग योजना अंमलांत आणण्याचा सरकारचा विचार आहे.

## महाराष्ट्रांत बँका व विमा कंपन्या ह्यांची वाढ

### गुण आहेत, त्यांचें चीज कसें होईल ?

(नाशिक येथें मे १९४९ अखेर भरलेल्या व्यापारी परिषदेंत, "देना बँके"चे डायरेक्टर श्री. लक्ष्मीकांत शांताराम दाभोळकर ह्यांचें डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज ह्यांच्या अध्यक्षतेखाली झालेलें भाषण.)

महाराष्ट्राच्या औद्योगिक भाग्योदयाचा विचार करणें झाल्यास ज्याप्रमाणें व्यापारधंदे, कारखाने आणि उद्योग यांची वाढ झाली पाहिजे त्याच प्रमाणानें किंबहुना त्याहीपेक्षां अधिक प्रमाणानें बँका व विमाकंपन्या प्रस्थापित झाल्या पाहिजेत. त्यांची आवश्यकता ही आतां सर्वमान्य गोष्ट झाली आहे. महाराष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या (म्हणजे हिंदमधील मराठी भाषिकांच्या) सलग प्रदेशाचें क्षेत्रफळ १,३३,४६६ चौरस मैल आहे. लोकवस्ती सुमारे २,८१,१७,६०५ असून त्यांत २,१६,००,००० हे मराठी मातृ-भाषा असणारे आहेत. इतर प्रांतांप्रमाणें जर महाराष्ट्राला आपलें वर्चस्व प्रस्थापित करावयाचें असेल तर महाराष्ट्रीयांनीं आजपर्यंत कवटाळलेला नोकरपेशा सोडून उद्योगधंद्याकडे तसेंच बँका व विमाकंपन्या यांच्या वाढीकडे लक्ष घातलें पाहिजे. आपल्या स्वतंत्र हिंदुस्थानचा उत्कर्ष व्हावा हें कोणालाही वाटणें साहाजिक आहे व तो करण्याची प्रत्येक प्रांतावर त्याची जबाबदारी आहे. प्रत्येक प्रांताचा उत्कर्ष म्हणजेच सर्व राष्ट्राचा उत्कर्ष हें ध्येय लक्षांत ठेवून पुढें सरसावण्याची जबाबदारी प्रत्येक प्रांतावर आहे. त्यांत महाराष्ट्रासारख्या औद्योगिक क्षेत्रांत मागें राहिलेल्या लहान कां होईना पण इतिहासप्रसिद्ध व सुविद्य प्रांतावर ही जबाबदारी तर मोठीच आहे. महाराष्ट्र शिक्षणाचे बाबतींत कुणालाही हार जाणार नाहीं. तशांत तो ज्या संस्था आज चालवीत आहे त्यावरून त्यांत कर्तबगारी व संघशक्ति आहे हेंहीं सिद्ध झालें आहे. महाराष्ट्रीय हे जात्या चौकस बुद्धीचे, चतुर, धूर्त, काटकसरी व झीज सोसणारे असून त्यांचे अंगीं सट्टेबाजी नसल्यामुळें ते विमा कंपन्या किंवा बँका सहज यशस्वी करूं शकतील. परंतु या सर्व गुणांचा उपयोग उद्योगधंदे किंवा बँका व विमा कंपन्या काढून, त्यांची वाढ करून, प्रांतांची स्थिति समृद्ध करण्यास त्यांनीं आजपर्यंत कां कचरावें हें समजत नाहीं. प्रांताच्या मानानें किंवा त्यामधील सुविद्य प्रजेच्या मानानें महाराष्ट्र आज उद्योगधंदे, फायनान्स, बँकिंग आणि इन्शुअरन्स या दृष्टीनें फारच मागें आहे असें म्हणावें लागेल. कांहीं अपवाद सोडून दिले तर महाराष्ट्राची आर्थिक प्रगति महाराष्ट्रीय कंपन्यांकडून व बँकांकडूनच जितकी व्हावी तितकी झालेली नाहीं व अजूनही होत नाहीं. जर आपले इतर देशबांधव किंवा संस्था महाराष्ट्रांत येऊन व्यापारधंदा यशस्वी रीतीनें चालवूं शकतात, तर आम्हां महाराष्ट्रियांस तो निदान आमच्या स्वतःच्या घरांत तरी अधिक चांगल्या प्रमाणानें चालवितां आला पाहिजे.

आजची परिस्थिति लक्षांत घेतां, ज्या बँकेचें अधिकृत भांडवल व गंगाजळी सरासरी ५ लाखांवर आहे अशा बँका एक डझनापेक्षां जास्त आज आमच्यांत नाहींत हें खालील विगतीवरून लक्षांत येईल:—

| | | |
|---|---|---|
| बँक ऑफ महाराष्ट्र, पुणा | १७ शाखा, | २ कोटी, १५ लाख |
| बँक ऑफ पुणा | ४ शाखा | २५ लाख |
| न्यू सिटीझन् बँक ऑफ इंडिया | ४८ शाखा | ३ कोटी, ६१ लाख |
| प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक, पुणा | २ शाखा | ६० लाख |
| बँक ऑफ कोल्हापूर, कोल्हापूर | ११ शाखा | २ कोटी, ८३ लाख |
| बँक ऑफ कोंकण, मालवण | ५ शाखा | १८ लाख |
| बेळगांव बँक, बेळगांव | २० शाखा, | ५४ लाख |
| सेफ् बँक, नागपूर | ५ शाखा | २१ लाख |
| सांगली बँक, सांगली | १२ शाखा | १३ लाख |
| यूनायटेड वेस्टर्न बँक सातारा | ६ शाखा | ७९ लाख |

तसेंच ज्या बँकांचें भरपाई झालेलें भांडवल व गंगाजळी १ ते ५ लाखांपर्यंत आहे अशाही बँका १ डझन असूं शकतील. विगत खालीलप्रमाणें—

| | | |
|---|---|---|
| बँक ऑफ औंध | ५ शाखा | १७ लाख |
| बँक ऑफ सिटिझन, बेळगांव | २३ शाखा | ४० लाख |
| बँक ऑफ कऱ्हाड | २ शाखा | १८ लाख |
| भारत इंडस्ट्रियल बँक | ७ शाखा | ४९ लाख |
| कमर्शिअल बँक, कोल्हापूर | ४ शाखा | ४१ लाख |
| फॉर्चून कमर्शिअल बँक | ३ शाखा | ७ लाख |
| जंजिरा बँक, जंजिरा | ३ शाखा | १८ लाख |
| रत्नाकर बँक, कोल्हापूर | ५ शाखा | ३१ लाख |
| सराफ बँक, कोल्हापूर | १ शाखा | ३ लाख |
| सातारा स्वदेशी कमर्शिअल कंपनी, सातारा, | ४ शाखा | ५० लाख |
| सुप्रीम बँक ऑफ इंडिया, बेळगांव | २ शाखा | १८ लाख |
| यूनियन बँक ऑफ कोल्हापूर | २ शाखा | २६ लाख |

महाराष्ट्रीय बँकिंग म्हणजे नुसत्या बऱ्याचशा बँका व त्यांच्या बऱ्याचशा शाखा असें असून चालणार नाहीं; त्याच बरोबर त्यांचें भांडवल व गंगाजळी यांचीही भरीव तजवीज पाहिजे. कारण बँकेची सुदृढता तिचें भांडवल व गंगाजळी यावरच केवळ अवलंबून असते. त्याचप्रमाणें बँकेची व्याजीं लावलेली रक्कम (Investment) व कर्जाऊ दिलेली रक्कम (Advances) याही तितक्याच प्रमाणानें कोणत्याही बँकेस सुदृढ आणि समृद्ध करींत असतात व ही सामुग्री असल्याशिवाय बँका व बँकेच्या शाखांची वाढ व्हावयाची नाहीं. ज्याप्रमाणें बँकेची मुख्य कचेरी (हेड ऑफिस) ही तिच्या शाखांस पोषक असते त्याचप्रमाणें कांहीं अंशीं शाखाही बँकेच्या हेड ऑफिस म्हणजे मुख्य कचेरीस उत्तेजन देऊन बँकेची भरभराट करूं शकतात. चांगल्या शाखा असणें, मोठ्या गांवीं असणें, इलाख्याच्या शहरीं असणें, किंवा जेथें व्यापार-उद्योग बऱ्याच प्रमाणानें होत आहे अशा ठिकाणीं असणें हें केव्हांही बँकेस फायद्याचेंच होतें. आज नुसतें मुंबईपुरतें बोलणें झाल्यास कांहीं महाराष्ट्रीय समजल्या जाणाऱ्या बँकांच्या मुख्य कचेऱ्या मुंबईंत आहेत तर दुसऱ्या बँकेच्या शाखाही आहेत. परंतु तिकडील महाराष्ट्रीय लोकांचे हातांत असलेल्या व्यापारधंद्यास या बँकेचें किती पाठबळ आहे हें पाहिल्यास आपणांस असेंच म्हणावें लागेल कीं महाराष्ट्राव्यतिरिक्त बँकांशी यांची तुलना करतां या बँका कामांत बऱ्याच मागें आहेत. आमच्यांतील व्यापारी वर्ग कदाचित या बँकाकडे पहात नसेल, तर कोणी महाराष्ट्रीय व्यापारी कदाचित या बँकाकडे गेल्यास त्यास पाहिजे असलेली रक्कम पुरविण्याचें धाडस या बँका करूं इच्छित नसतील. मुख्य मुद्याची गोष्ट म्हणजे ज्याला आपण इंग्लिशमध्यें "ब्रँच बिझिनेस" म्हणतों तो आमच्यांत बऱ्याच प्रमाणांत कमी आहे. तो वाढविल्याशिवाय बँकेची जितकी भरभराट व्हावी तितकी ती होणार नाहीं. महाराष्ट्रीय व्यापारी व बँका यांचें लक्ष या गोष्टींकडे जितकें जावें तितकें गेलेलें नाहीं असेंच म्हणावें लागेल. आमच्यांतील व्यापारीवर्ग व्यवहारासाठी महाराष्ट्रीय बँकाव्यतिरिक्त दुसऱ्या बँकाकडे पाहात असतो, ही दृष्टी बदलली पाहिजे.

(अपूर्ण)

## पुनर्घटित सहकारी चळवळ.

( लेखकः—श्री. य. द. खोले. )

मुंबई सरकारनें प्रांतांतील सहकारी संस्थांचे प्रतिनिधी व कार्यकर्ते यांच्या सल्ल्यानें इलाख्यांतील पतवाल्या शेतकऱ्यांना त्यांच्या परत फेडीच्या ऐपतीप्रमाणें योग्य त्या कमी व्याजानें कर्ज पुरवठा करण्याचें काम सहकारी संस्थांमार्फत व्हावें असा निर्णय दिला व या कार्यास योग्य अशी सहकारी चळवळीची पुनर्घटना व्हावी असा निर्णय दिला. या निर्णयानुसार प्रांतिक सहकारी बँकेपासून सोसायट्यांपर्यंत घटनेमध्यें आमूलाग्र फरक करण्याचे बाबत अद्यापहि मध्यवर्ती जिल्हा बँका व प्रांतिक सहकारी बँका तसेंच सहकारी बँका यामध्यें वाटाघाटी सुरू असून निश्चित निर्णय होऊन खरें खुरें कार्य होण्यास किती अवधी लागेल याचा अंदाज आजच करतां येण्या सारखा नाहीं. तथापि असें म्हणावयास हरकत नाहीं कीं मतभेदाचे प्रश्न सामोपचारानें सुटले जाऊन लवकरच मूर्त स्वरूप येऊन सहकारी चळवळीचे पाऊल योग्य त्या मार्गावर पडेल.

### मूलभूत तत्त्व

सहकारी चळवळ मुख्यतः देशांतील बहुसंख्य अशा श्रमजीवी शेतकऱ्यांचे हितासाठींच असल्यानें व त्यांच्या आर्थिक गरजा दूर करून त्यांची रहाणी तसेंच जीवन सुधारण्यासाठी अस्तित्वांत आली. शेती व्यवसाय आर्थिक दृष्ट्या तोट्याचा आहे किंवा शेत कर्ज पुरवण्यामध्यें आर्थिक घस लागण्याचा संभव आहे म्हणून नागरी सहकारी कार्यकर्त्यानें त्याकडे दुर्लक्ष ठेवणें हितावह नाहीं. शेती सहकारी चळवळ स्वतंत्र आहे व नागरी सहकारी चळवळीवर जास्त जोर देऊन कार्य करणें समाजरचना व परस्पर संबंध या दृष्टीनें हितावह नाहीं. शेती पतपेढी व त्या द्वारा शेती व्यवसायांतील लोकांच्या अडचणी समजाऊन घेऊन त्यास कार्यक्षम, स्वावलंबी व आर्थिकदृष्ट्या योग्य त्या परिस्थितीवर आणण्याचे दृष्टीनेंच सहकारी चळवळीची पुनर्घटना झाली पाहिजे.

### प्राथमिक शेतकी सोसायट्या

सहकारी चळवळीची पुनर्घटना पुढें ढकलावी असें म्हणणारा एक वर्ग असून त्यास असें प्रामाणिकपणें वाटतें कीं देशांतील आजची सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिति योग्य नाहीं. हिंदुस्थान सरकारचें अन्नधान्यादिबाबतचें धोरणही किती काळ निश्चित राहील हेंही आज सांगतां येत नाहीं. त्यांतच हल्लीं देशी संस्थानें विलीन करण्याचा अगर होण्याचा जोरानें प्रयत्न होत असून त्याचें दृश्य फलही दिसूं लागलें आहे व त्यांतच कांहीं जिल्हा मध्यवर्ती बँकांना पुनर्घटनेसंबंधीं वाटत असलेली भीति या सर्व कारणामुळें पुनर्घटनेचा प्रश्न पुढें ढकलावा. खरोखर अशी जर परिस्थिति असेल तर ती स्पष्टपणें सरकार व सहकारी कार्यकर्ते यांपुढें मांडून त्याबाबत निर्णय घेण्याची वेळ आली आहे. केवळ कांहीं समजुतीच्या चार गोष्टी सांगून वेळ निभावून नेणें श्रेयस्कर होणार नाहीं असें स्पष्ट म्हणण्याची वेळ आली आहे. सहकारी चळवळीच्या पुनर्घटनेचा व यशस्वितेचा मूळ पाया म्हणजे प्राथमिक सहकारी सोसायट्या होत. या प्राथमिक संस्था आतां नियमित अगर अनियमित जबाबदारीच्या राहणार असून सध्या असलेल्या जबाबदारीमध्यें फरक करण्याची सवलतही राहणार आहे. तसेंच आजपर्यंत असलेली सभासदांच्या संख्येची मर्यादाच रहाणार नाहीं. या पुढें आर्थिक गरजा शक्यतोंवर सहकारी संस्थामार्फत भागणार असल्यानें सहकारी पतपेढ्यांचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर चालतील असें धरून चालण्यास हरकत नाहीं. सहकारी सोसायटी या पुढें केवळ कर्ज देण्याची संस्था न रहातां 'विविध कार्यकारी' सोसायटी राहावी असा कटाक्ष राहून शेतकऱ्याच्या जीवनांतील सर्व गरजा सहकारी पतपेढीमार्फत चालण्याची उमेद आहे. कर्ज ऋण विमोचन कायद्यामुळें शेतकऱ्यांना यावें लागणाऱ्या पिक कर्जाची जबाबदारी सहकारी संस्थेनें आगाऊच घेतली असून याशिवाय नियंत्रित-धान्य, कापड, लोखंड, वगैरे मालांचें वाटपही त्यांचेमार्फत व्हावें असा उपक्रम सुरू आहे. याशिवाय अधिक धान्य पिकविणें वगैरे सरकारी कार्यक्रमांत सक्रिय अशी कामगिरी करण्याचें कार्य सहकारी संस्थांना करावयाचें आहे. याही बरोबर एक महत्त्वाची अशी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं प्रांतातील शेतकऱ्यांचे जीवनावर नवीन नवीन कायद्यानें होणारे परिणाम याबाबतही सोसायट्यांना पुढें यावें लागणार आहे.

या सर्व जबाबदाऱ्या स्वीकारून खेडेगांवांतील शेतकऱ्यांना सोसायटी खरीखुरी उपयुक्त व्हावयाची असेल तर कोणत्या गोष्टींची जरूर आहे याचा तपशीलवार विचार पहावयास पाहिजे. सहकारी चळवळीची पुनर्घटना म्हणजे केवळ प्रांतिक अगर सहकारी जिल्हा बँका यांच्यापुरता प्रश्न मर्यादित ठेवून चालणार नाहीं.

### कार्यक्षम नोकरवर्ग

आजची प्राथमिक सहकारी संस्थांची परिस्थिती विचारांत घेतां असें दिसून येते कीं, प्राथमिक सहकारी संस्थामध्यें झपाट्यानें वाढ होत आहे. ही वाढ धान्य केंद्र अगर वाटप केंद्र मिळविण्यासाठीं होत असो अगर इतर कारणासाठीं होत असो, एक गोष्ट खरी कीं या सोसायट्यांचा उपयोग पुढें शेतकऱ्यांच्या जीवनांत होईल असें आज तरी म्हणावयास हरकत नाहीं. अशा या नवीन व पूर्वी स्थापन झालेल्या सोसायट्यांचे बाबत मुख्य अडचण म्हणजे पूर्ण कार्यक्षम असा सेक्रेटरी असणें जरूर आहे. या बाबतची आजची परिस्थिति भयावह आहे असें म्हणणें चूक नाहीं. सोसायटीला त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळें भरपूर पगार देऊन खेडेगांवात काम करणारा नोकर वर्ग उपलब्ध होत नाहीं. झाल्यास त्यास कामाची माहिती नसते व यदा कदाचित् कार्यक्षम व माहितगार असा नोकर मिळाल्यास तो टिकण्याची शक्यता कमी. या ठिकाणीं कळकळीनें व स्पष्टपणें हें नमूद करावयास पाहिजे कीं, पुनर्घटनेच्या तपशीलांचा विचार करतांना जिल्हानिहाय आज अस्तित्वांत असलेल्या सोसायट्या, नवीन स्थापन होण्याची शक्यता, या सर्वांचा विचार करून सोसायटीसाठीं शिक्षण देऊन तयार केलेला नोकरवर्ग प्रथम उपलब्ध करून न दिल्यास पुनर्घटनेचें कामीं अडथळे निर्माण होतीलच परंतु कदाचित् अपयशहि येण्याचा संभव जास्त. केवळ शिक्षण देऊन सेक्रेटरी वर्ग तयार करून चालणार नाहीं, तर त्यांच्या पगाराची श्रेणी, नोकरीचें स्थैर्य, सवलती व सुखसोई या बाबत व त्यांचे नोकरीवर देखरेख करण्यासाठीं जिल्हा निहाय घटना करणें अगत्याचें आहे. असें जर होऊं शकलें नाहीं, तर शेतकी पतपेढ्या व त्यांचे सभासद यांना परस्परास खरेखुरे उपयोगी पडणें कठीण जाईल असें वाटतें.

---

**नेपाळच्या अर्जाचा विचार तहकूब**—संयुक्त राष्ट्रसंघाचे सभासद होण्यासाठी नेपाळनें केलेल्या अर्जाचा विचार सभासद-कमिटीनें तूर्त तहकूब केला आहे. नेपाळच्या अर्जाला रशिआनें विरोध केला होता. नेपाळच्या स्वतंत्रतेबद्दल अधिक माहिती मिळाल्यावर अर्जाचा विचार करण्यांत येणार आहे.

## व्यापारी व इतर बातम्या

**इटलींत मुबलक पेट्रोल**—इटलीमध्यें पेट्रोलसाठी कूपन्स काढून वांटप करण्याची गरज राहिलेली नाहीं, असें समजतें. त्या देशांत आतां कोठेंही कूपन्सशिवाय पेट्रोल मिळूं शकतें.

**रशिआ–इजिप्त ह्यांचा व्यापार**—रशिआ आणि इजिप्त ह्या दोन देशांत २५ लाख पौंडांच्या मालाची देवाण–घेवाण करणारा व्यापारी करार नुकताच झाला. रशिआ इजिप्तला दर टनामागें २५ पौंड किंमत घेऊन १,००,००० टन गहूं देणार आहे आणि त्याच्या मोबदला कापूस घेणार आहे. ही खरेदी खुल्या बाजारांतच करण्यांत येणार आहे. मात्र करारांत असें एक बंधन घालण्यांत आलें आहे कीं, रशिआनें हा कापूस आपल्या देशाबाहेर पाठवून पुन्हा विकावयाचा नाहीं.

**४४० मजल्यांची इमारत**—सॅन् फ्रॅन्सिस्को येथील एका एंजिनिअरनें ४४० मजल्यांची इमारत बांधण्यासाठी जरूर असणारे नकाशे वगैरे कागदपत्र शहराच्या अधिकाऱ्यांकडे सादर केले आहेत. ह्या इमारतींत ४,००,००० लोक राहूं शकतील. इमारतींत ३०० विजेचे पाळणे, २० ख्रिस्ती देवळें, ५० क्लब्स, १० इस्पितळें, ह्यांची सोय करण्यांत येईल. ८०,००० मोटारगाड्या ठेवण्याचीही व्यवस्था केली जाईल. ह्या इमारतींत रहाणाऱ्या माणसाला फक्त स्वतःच्या दफनविधीसाठीच बाहेर पडावें लागेल! कारण, इमारतीच्या योजनेंत दफनभूमीची मात्र सोय नाहीं.

**तिसरें महायुद्ध टळण्याची शक्यता**—इंग्लंडचे युद्धकालीन मुख्य प्रधान मि. विन्स्टन चर्चिल ह्यांनीं एका भाषण प्रसंगीं अशी आशा व्यक्त केली, कीं तिसरे महायुद्धाचें दुःस्वप्न टळणें शक्य आहे. पाश्चिम युरोपच्या सांस्कृतिक सामर्थ्यामुळें आणि जरूर पडल्यास प्राण धोक्यांत घालून स्वातंत्र्य रक्षण करण्याच्या निश्चयामुळें मला युद्ध टळण्याची आशा अधिकाधिक वाटूं लागली आहे, असें ते म्हणाले. सोव्हिएट रशिआ आणि पूर्व–युरोपांतील राष्ट्रें मि. चर्चिल ह्यांच्यावर युद्धास चिथावणी देण्याचे आरोप करीत असतात हें प्रसिद्धच आहे.

**पाकिस्तान कर्ज घेणार**—पाकिस्तान इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाचे सभासद झाल्याबरोबर त्या संस्थेकडून १६,५०,००,००० डॉलर्सचें कर्ज मागणार आहे असें समजतें.

**खेडेगांवासाठी वैद्य**—मद्रास सरकारनें खेडेगांवांतील लोकांना वैद्यकीय मदत देण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्यरक्षणासाठी कांहीं उमेदवारांना ६ महिन्यांचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. ह्या शिक्षणक्रमासाठी चार केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत.

**मध्यप्रांतांतील पडीक जमीन**—मध्यप्रांतांत यांत्रिक नांगरांचा उपयोग करण्यास प्रारंभ केल्यापासून ५०,००० एकर पडीक जमीन प्रथमच लागवडीस आणली गेली आहे. ह्या जमिनींत पूर्वी गवत आणि झाडेंझुडपें ह्याशिवाय कांहींच उगवत नसे.

**मुंबई प्रांतांतील संप**—गेल्या एप्रिलमध्यें मुंबई प्रांतांतील संपांची संख्या रोडावल्याचें दिसून येतें. एप्रिल महिन्यांत एकूण २८ संप झाले आणि त्यांत १० हजार कामगारांनीं भाग घेतला. त्यामुळें कामाचे ४१,५०० दिवस वाया गेले. मार्चमध्यें ३५ संप झाले होते, त्यांत ३२,८०० कामगारांनीं भाग घेतला आणि ८८,५०० दिवस वाया गेले. गेल्या वर्षाच्या एप्रिलमध्यें ७८ संपांतून ३७,४०० कामगारांनीं भाग घेतला होता आणि त्यामुळें १,२२,३०० दिवस वाया गेले होते. चालू वर्षाच्या एप्रिल महिन्यांतील संपांपैकीं ६ संप कापड गिरण्यांतून झाले.

**बोटींची वहातूक आणि डॉलर्स**—शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचे जनरल मॅनेजर श्री. एम. ए. मास्टर ह्यांनीं नुकतीच अशी माहिती सांगितली कीं, हिंदी बोटींनीं हिंद सरकारला दोन वर्षांत ५० लाख डॉलर्स मिळवून दिले. १९४८ सालीं अमेरिकेला धान्याच्या वहातुकीसाठींच सुमारें ९०लाख डॉलर्स द्यावे लागले. ह्या शिवाय इतर मालाच्या वहातुकीसाठीं ५५ लाख डॉलर्स द्यावे लागले ते निराळेच. चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहींत धान्याच्या वहातुकीसाठी अमेरिकेला ४५ लाख डॉलर्स द्यावे लागले. हिंदी बोटींची संख्या वाढवून मालाची ने–आण करण्यांत त्यांना अग्रहक्क दिल्यास दुर्मिळ डॉलर्सची खूपच बचत होईल.

## ब्रिटिश समाजवाद आणि वृत्तपत्रांचा नफा

ब्रिटनमधील पुष्कळशीं वृत्तपत्रें सध्याचें मजूर सरकार देशाच्या घात करीत आहे, असा प्रचार करीत असतात. ह्या वृत्तपत्रांना झालेले नफे ह्यांचा विचार करता ब्रिटिश समाजवाद त्यांच्या पथ्यावर पडलेला दिसतो! पुढील तौलनिक आकडे वार्षिक अहवालावरून घेतलेले आहेत.

| वृत्तपत्र | (१९३९) | | (१९४७-४८) | |
|---|---|---|---|---|
| | नफा (पौंड) | % | नफा (पौंड) | % |
| असोशिएटेड न्यूजपेपर्स | ४,४५,२६६ | १२½ | ७,४१.००० | २० |
| डेली मेल | १,९०,८९८ | २⅓ | ३,९५०९० | १२½ |
| डेली मिरर | ५,०३,५६० | २५ | ५,६१,१४४ | ३० |
| केम्सले न्यूजपेपर्स | ८६९,५५२ | ५ | १,७०९,१३८ | १२ |
| लंडन एक्सप्रेस | १८७,३८१ | २० | १,९४५७५ | २० |
| न्यूज ऑफ दि वेर्ल्ड | ७,४८,६३९ | २० | १०,९०,६८५ | १५ |
| ऑढॅम्स | ३७८,७४५ | ६ | १०,४३,३७४ | १२½ |
| सन्डे पिक्टोरिअल | १,५०,७२६ | १० | ३,३६४४५ | ३० |
| फिनॅन्शिअल टाइम्स | १८,३११ (तोटा) | | ४,६९,२९४ | १५ |


# महाराष्ट्र सहकारी विद्यालय

### पुणें

या विद्यालयाचे वर्ग ता. १ जुलै १९४९ पासून नं ५ बैरामजी जीजीभाई रोड पुणें १ येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असि. को-ऑफिसर, खरेदी विक्री संघाचे मॅनेजर व विविध कार्यकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गास लागणारें शिक्षण देण्यांत येतें. हा अभ्यासक्रम पुरा करून 'को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा' मिळविणाऱ्यांना सहकारी खात्यामध्यें नोकरीसाठीं विशेष पसंती देण्यांत येते. मॅट्रिक पास झालेल्या विद्यार्थ्यांना व सहकारी संस्था व खाते येथील नोकरवर्गास प्रवेश दिला जातो. उमेदवारांनीं ता. २५ जून १९४९ च्या आंत अर्ज करावे.

वा. वि. कुंभारे,
सुपरिन्टेन्डेन्ट.

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

बँकिंग खातें : २७ मे, १९४९

| देणें | रु. |
|---|---|
| वसूल भांडवल | ५,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ५,००,००,००० |
| ठेवी | |
| ( अ ) सरकारी | |
| ( १ ) मध्यवर्ती सरकार | १४८,३६,६६,००० |
| ( २ ) इतर सरकार | २१,१३,७३,००० |
| ( ब ) बँका | ६५,७०,२०,००० |
| ( क ) इतर | ६०,२१,०८,००० |
| बिलें | ४,३३,४१,००० |
| इतर देणीं | १६,४१,३५,००० |
| एकूण रु. | ३२६,१६,४३,००० |

| जिंदगी | रु. |
|---|---|
| नोटा | ३२,२५,३५,००० |
| रुपये | १३,४७,००० |
| इतर नाणीं | १,५५,००० |
| बिलें, विकत घेतलेलीं व डिस्कौंट केलेलीं | |
| ( अ ) स्वदेशांतील | ४६,८४,००० |
| ( ब ) बाहेरील | ... |
| ( क ) सरकारी ट्रेझरी बिलें | ९,३७,१७,००० |
| परदेशांतील रोकड व अल्पकालीन रोखे | १५५,३८,२०,००० |
| सरकारांना कर्जें | ३,३९,००,००० |
| इतर कर्जें | ७,६६,८२,००० |
| इनव्हेस्टमेंटस | १११,९९,९३,००० |
| इतर जिंदगी | ५,३८,१०,००० |
| एकूण रु. | ३२६,१६,४३,००० |

**कम्युनिस्ट चीन आणि अमेरिकन सरकार**—अमेरिकेचें परराष्ट्रीय खातें कम्युनिस्ट चीनशीं व्यापार करण्यासंबंधीं धोरण आखीत आहे. पूर्व युरोपांतील देशांशीं व्यापार करण्याबाबत जशीं बंधनें घालण्यांत आलीं आहेत त्याचप्रमाणें चीनच्या बाबतही घालण्यांत येतील असें समजतें. कम्युनिस्ट चीनला अमेरिकेकडून कर्ज मिळणार नाहीं; अमेरिकेकडून विकत घ्यावयाच्या मालासाठी रोख पैसा अगर माल द्यावा लागेल; त्याचप्रमाणें युद्धाच्या दृष्टीनें महत्त्वाचा असलेला मालही चीनला पुरविण्यांत येणार नाहीं. रशिआला अगर पूर्व युरोपला धाडला न जाणारा माल चीनलाही मिळणार नाहीं. अमेरिकेनें अद्याप नव्या चीनला मान्यता दिली नसली तरी कम्युनिस्ट-शासित चीनमधील मोठ्या शहरांतील अधिकाऱ्यांशीं अमेरिकन मुत्सद्दी हातजुळवणी करीत आहेत.

**पाकिस्तानांत फ्रेंच बँक**—पुढील वर्षी पाकिस्तानांत एक फ्रेंच एक्सचेंज बँक आपलें काम सुरू करणार आहे असें समजतें. अशा बँकेला कराचींत कितपत वाव आहे तें अजमाण्यासाठीं दोन फ्रेंच बँकर्स नुकतेच तेथे येऊन गेले.


D. E. Society's

**Brihan Maharashtra College of Commerce,**

**Poona 4.**

Applications for fresh admission to the First Year and B. Com. classes will be received up to the 10th June, 1949. The College prospectus containing the application form will be sent on receipt of postal stamps worth annas four. Applications received after 10th June will not be considered.

S. V. Kogekar,
Principal

**WILLINGDON COLLEGE, SANGLI**

The College reopens on 20th June 1949 for the academic year 1949–1950. It provides for instruction in Arts and Science Courses leading up to B. A. (General and Honours) and B. Sc. (Principal Chemistry and Mathematics).

Students should secure admission in College as well as Hostel as early as possible in order to avoid disappointment. The Prospectus and application forms giving all details will be supplied on request.

K. G. Pandit,
Principal.

**बँक ऑफ पूना, लिमिटेड.**

( शेड्यूल्ड बँक )

अधिकृत भांडवल रु. ५०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल रु. २५,००,०००
वसूल भांडवल रु. १२,५०,०००

मध्यम वर्गीयांना मासिक उत्पन्नांतून एका रकमेनें मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत नाहीं. दरमहा ५ रु. नियमित शिल्लक टाकल्यास पांच वर्षांत ३०० रुपये स्वतःचे होतात. अशा बचत योजनेच्या रकमेवर ३ टक्क्यापर्यंत व्याज मिळण्याची सोय.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जास्त माहितीसाठीं मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.

मुख्य कचेरी:–४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

स्थानिक शाखा:–( १ ) भवानी पेठ. ( २ ) सदाशिव पेठ.

बाहेर गांवच्या शाखा:–(१) टिळक चौक, सोलापूर, (२) वखार भाग, सांगली.

## अमेरिकेची आर्थिक परिस्थिति

( भा. म. का. )

अमेरिकेमध्यें किंमती घटूं लागल्या आहेत त्यामुळें कदाचित् मंदी लवकरच येईल अशी भीति कांहीं वेळां व्यक्त केली जाते, परंतु ही भीति निराधार आहे असें निश्चित मत बरो ऑफ ॲग्रिकल्चरल एकॉनॉमिक्स् ह्या संस्थेनें नुकतेंच व्यक्त केलें आहे. १९४९ मध्यें मजुरीचे दरांत वाढ होणें संभवनीय दिसत नाहीं. कदाचित् नोकरीवर असणारांचें प्रमाण किंचित् कमी होईल. परंतु, तसें झालें तरी लोक आपला खर्च तेवढ्या प्रमाणांत कमी करून परिस्थितीला तोंड देतील. किमतींनीं गेल्या वर्षी उच्चांक गांठला होता व आतां त्या हळू हळू कमी होऊं लागतील. १९४८ सालीं औद्योगिक उत्पादनानें उच्चांक गांठला व हंगामांत कामावर असणारांची संख्या ६ कोटी, १६ लक्ष होती. १९४७ च्या मानानें खाजगी रीत्या उद्योगधंद्यांत ३२ टक्के जास्त भांडवल गुंतविलें गेलें. घरें बांधणें व नवीन यंत्रसामुग्री खरेदी करणें यांवर विशेष भांडवली खर्च झाला. १९४७ च्या मानानें १९४८ सालीं निर्गत अल्प प्रमाणांत कमी झाली. १९४९ सालीं शेतीच्या मळ्यांचें उत्पन्न किंचित् कमी होईल. परंतु एकंदरींत सर्व तऱ्हेच्या सरकारी खर्चांत वाढ होईल. मागील वर्षाप्रमाणेंच घरें बांधणें व नवीन कारखान्यांत पैसे गुंतविणें ह्या कामांना चालना मिळेल. एकंदरींत उत्पादन, किंमती व मालाची मागणी यांमध्यें इष्ट तें नातें राहील व आर्थिक परिस्थिति समाधानकारक राहील.

असेंच अनुकूल मत फेडरल डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशननेंहि नुकतेंच व्यक्त केलें आहे. अमेरिकेची परिस्थिति मजबूत पायावर आधारलेली आहे व ती प्रगतिदर्शकच राहील असा ह्या कार्पोरेशनचा विश्वास आहे. लढाईनंतर केव्हांहि साध्य झाला नाहीं असा 'पैसा' व 'माल' यांच्यांत समतोलपणा १९४८ सालीं साध्य झाला होता, व हीच परिस्थिति यंदाहि चालू राहील असा अंदाज आहे. अमेरिकेच्या बँकाहि गेलीं कांहीं वर्षें सुस्थितींत आहेत. बँकांमुळें कोणाहि ठेवीदारांचें गेल्या दहा वर्षांत नुकसान झालेलें नाहीं. अमेरिकेंतील बहुतेक बँकांनीं फेडरल डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशनमध्यें विमा उतरलेला आहे. त्या कॉर्पोरेशनचें मत मौलिक समजलें जातें.

## सावकारी नियंत्रण कायद्याचा भंग

### शिक्षा वाढणार!

सावकारी नियंत्रण कायद्याचा भंग करणारांविरुद्ध सरकारनें उपाययोजना करण्यास प्रारंभ केला आहे. लायसेन्स न घेतां सावकारीचा धंदा करणें, ठराविक पद्धतीनें हिशेबाच्या वह्या न राखणें, भरमसाट ( १८ ३/४% ते १५०% ) दरानें व्याज आकारणें, इत्यादि प्रकारासाठीं गुन्हेगारांवर खटले होऊन त्यांस शासन होऊं लागलें आहे. पहिल्या गुन्ह्यास कमाल २०० रु. दंडाची शिक्षा सांगितलेली आहे, परंतु ही शिक्षा फारच सौम्य होते, असें मत मुंबईच्या चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें नुकतेंच व्यक्त केलें. रजिस्ट्रार ऑफ मनीलेंडर्सनें सरकारास लिहून शिक्षा वाढवून द्याव्यात, असें त्यांनीं सुचविलें. रजिस्ट्रारनें अशी मागणी सरकारकडे अगोदरच केली आहे.


दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५

एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.



उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तु, इत्यादीसाठी चौकशी करा:—

दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५१९

औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें

( १ ) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज ( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ. )
( २ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन ( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. )
( ३ ) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट ( ले.:—. रेवि ॲले, किं. २ रु. )
( ४ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज ॲंड व्हिलेज इंडस्ट्रीज इन बॉंबे प्रॉव्हिन्स ( ले.:— एल. एन. रेणु, किं. १ रु. ४ आ. )


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.